# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
## अउदा बांधकाम नि संवसु परिमंडल, अमरावती

**जाहिरात क्र.: ०१/२००८**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या. अंतर्गत असलेल्या मुख्य अभियंता, अउदा बांधकाम नि संवसु परिमंडल, अमरावती यांच्या कार्यक्षेत्रातील वेगवेगळया क्षमतेची ४७ उपकेंद्रे व एकुण ३०७० एमव्हीए कॅपॅसिटी, तसेच जवळपास ३९०४ सर्किट किलोमिटर जाळे असलेल्या पारेषण क्षेत्राखाली येणा-या विविध उपकेंद्रासाठी खाली नमुद केलेल्या प्रवर्गातील वेतनगट ३ व ४ मधील रिक्त पदे सरळसेवा भरतीद्वारे भरावयाची असून त्याकरिता सुदृढ, कार्यक्षम आणि पात्र अशा इच्छुक उमेदवारांकडून खालील पदांसाठी विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ क्र | पद कोड क्र. | पदांचे नांव | जातीचा प्रवर्ग | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | अपंग | एकुण |
| १ | ०१ | सहा.यंत्रचालक (प्रशिक्षणार्थी) | १५ | ६ | ३ | २ | ५ | १ | १ | ६ | ४५ | लागू | ८४ |
| २ | ०२ | वाहिनी मदतनीस (प्रशिक्षणार्थी) | २१ | ३० | १३ | ६ | १५ | ७ | ५ | १५ | ११५ | १४ | २४१ |

[अपंग उमेदवार : अंधअल्पदृष्टी (PS)-(अ.दृ.), अंशतः कर्ण बधीर (PD)-(क.ब.), अस्थीव्यंग (OA)-(एक हात अधू) ]

**टिपः**

१) शासन निर्णय क्र.८२/२००१/एमएसए/४१५/केए-२, दि.२५.०५.०१ नुसार महिलांसाठी ३० टक्के आरक्षण राहील. महिला आरक्षणांतर्गत महिला उमेदवारांनी अर्ज करतांना ‘उन्नत / प्रगत‘ गटांत मोडत नसल्याबाबतचे (Non-creamy-layer) सक्षम अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सन २००७—२००८ या कालावधीतील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

२) ‘अपंग‘ प्रवर्गासाठी ३ टक्के आरक्षण राहील. अपंग प्रवर्गाच्या उमेदवाराजवळ अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्केपेक्षा कमी नसल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक यांनी दिलेले किंवा मेडिकल बोर्डाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

३) माजी सैनिकांसाठी १५ टक्के आरक्षण राहील. माजी सैनिक असणा-यांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालय यांच्याकडे नांव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. अशा माजी सैनिकांनीच अर्ज सादर करावेत अन्यथा त्यांचा अर्ज स्विकारला जाणार नाही.

४) प्रकल्पग्रस्तांसाठी ५ टक्के आरक्षण राहील. प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी जिल्हाधिकारी यांचेकडे नांव नोंदविले असले पाहिजे, तसेच त्यांच्याकडून विहित नमुन्यातील प्रकल्पग्रस्त असल्याचे प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे. जिल्हाधिकारी यांनी पाठविलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या जेष्ठता यादीत नांव असणे आवश्यक आहे.

५) महिला, माजी सैनिक व प्रकल्पग्रस्त यांचेसाठी आरक्षण हे समांतर आरक्षण असल्याने या आरक्षणांतर्गत निवड झालेले पात्र उमेदवार हे त्या त्यापदाच्या अनुशेष निहाय आरक्षणाखाली उदा. अ.जा, अ.ज., वि. जा.-अ,भ.ज.-ब,भज-क,भज-ड,विमाप्र,इमाव व खुल्या प्रवर्गातील राखीव जागांवर दर्शविण्यात येतील.

## (क) वेतनश्रेणी व एकुण पगार (अंदाजे)

| अ.क्र | पदाचा कोड क्र. | पदाचे नांव | सध्याची वेतनश्रेणी | एकुण अंदाजे पगार |
|---|---|---|---|---|
| १ | ०१ | सहा.यंत्रचालक (प्रशिक्षणार्थी) | रु.४३०५—१३५—४९८०—१५०—६४८०—१६५—११७६० | रु.१०,०००/- |
| २ | ०२ | वाहिनी मदतनीस (प्रशिक्षणार्थी) | रु.३७२०—७०—४०७०—८५—४९२०—१००—७२२० | रु.८,०००/- |

(सुधारीत वेतनश्रेणी विचाराधीन)

## (ख) शैक्षणिक अर्हता व अनुभव

१ **सहा.यंत्रचालक : (प्रशिक्षणार्थी)** उमेदवाराने वीजतंत्री किंवा तारतंत्री व्यवसायात आय.टी.आय उत्तीर्ण असणे व त्यानंतर शिकाउ उमेदवारी अधिनियम, १९६१ अन्वये १/२ वर्षाचा शिकाउ उमेदवार म्हणून काम केलेले असणे आवश्यक आहे. शिकाउ उमेदवारी पुर्ण केल्यानंतर संबंधित व्यवसायातील प्रमाणपत्र व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून एन.सी.टी.व्ही.टी चे प्रमाणपत्र धारण केलेले असणे आवश्यक आहे.

२ **वाहिनी मदतनीसः (प्रशिक्षणार्थी)** उमेदवाराने वीजतंत्री किंवा तारतंत्री व्यवसायात आय.टी.आय. उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

## (ग) वयोमर्यादा

वरील दोन्ही पदांसाठी सर्वसाधारण उमेदवाराचे किमान वय अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास **किमान १८ वर्षे पूर्ण असावे. दोन्ही पदांसाठी कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे राहील**. मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम राहील. माजी सैनिक / प्रकल्पग्रस्त / अपंग यांच्यासाठी सर्वसाधारण कमाल वयोमर्यादा नियमाप्रमाणे शिथिलक्षम राहील. शिकाउ उमेदवारांसाठी प्रशिक्षण कालावधी वर्ष इतकी कमाल वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

तसेच, म.रा.वि.पारेषण कंपनीतील पात्र कर्मचा-यांसाठी कमाल वयोमर्यादेची अट लागू राहणार नाही.

## (घ) सर्वसाधारण अटी :

१ जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या रिक्त पद संख्येत / आरक्षणांत बदल होण्याची शक्यता आहे. पदसंख्येत/ आरक्षणांत बदल झाल्यास त्याबाबतचा वेगळा खुलासा जाहिरातीद्वारे वा अन्य मार्गाने करण्यांत येणार नाही.

२ जाहिरातीतील नमुद केलेल्या पदासाठी आवश्यक ती अर्हता व अनुभव धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांनीच अर्ज करावा.

३ महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचीत जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.०८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९.०१.२००४ पासून अंमलात आणला आहे. सदर अधिनियमानुसार फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना सोडून उर्वरित मागासवर्गातील सर्व जाती प्रवर्गातील म्हणजे विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना उन्नत/प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व लागू केले आहे. त्या प्रवर्गातील उमेदवारांनी **जात** उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ०१.०४.२००८ नंतरचे किंवा जाहिरातीच्या दिनांकास वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.

४ मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीच्या दाखल्याबरोबरच जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले 'जाती वैधता प्रमाणपत्र' सादर करणे आवश्यक आहे. तथापि, अनुसूचित जमती व्यतिरिक्त इतर मागासवर्गीय प्रवर्गातील ज्या उमेदवाराकडे वैधता प्रमाणपत्र नसेल त्यांना शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२००३/प्र.क्र. -९१/मावक-५, दिनांक २८.०१.२००४ व क्र. सीबीसी-१०/२००३/प्रक्र-९१/मावक-५, दिनांक ०६. ०२.२००४ नुसार ३ महिन्यांच्या आंत जाती वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर तात्पुरती नियुक्ती देण्यांत येईल. मात्र संबंधित उमेदवाराने ३ महिन्याच्या आंत जाती वैधता प्रमाणपत्र सादर करणे हि सर्वस्वी सदर उमेदवाराची जबाबदारी राहील. विहित ३ महिन्यांच्या आत उमेदवाराने जाती वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची सेवा कोणतीही नोटीस न देता समाप्त करण्यांत येईल याची नोंद घ्यावी. शासनाच्या आदेशानुसार अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना **'जाती वैधता प्रमाणपत्र'** सादर करणे बंधनकारक राहील.

५ मागासवर्गीय उमेदवारांची गुणवत्तेवर निवड झाल्यास त्याची निवड ही 'खुल्या प्रवर्गात' झाल्याचे समजण्यांत येईल.

६ शासकीय/ निमशासकीय/ महामंडळ तसेच इतर वीज कंपन्यामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनी त्यांच्या विभागामार्फत / योग्य अधिकारी वर्गामार्फत अर्ज करावा. **अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्यांच्या पूर्वीच्या कंपनीच्या / संस्थेच्या सेवेची कोणतीही जबाबदारी घेण्यांत येणार नाही.**

७ सदर जाहिरात महाराष्ट्र सिव्हील सर्व्हिसेस (Declaration of Small Family) अधिनियम, २००५ अंतर्गत विहित केलेल्या छोटे कुटुंब व्याख्यांमध्ये मोडणे ही एक आवश्यक पात्रता आहे.

## (ज) <u>अर्ज करण्याची पध्दत</u>

१. उमेदवाराने जाहिरातीसोबत जोडलेल्या नमुन्यात ए-४ या आकाराच्या कागदावर टंकलेखित स्वरुपांत अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच अर्जाच्या नमुन्यात दर्शविलेले सर्व रकाने / स्तंभ त्यांतिल सुचनांनुसार भरणे आवश्यक आहे. चुकीचे अथवा खाडाखोड केलेले अर्ज स्विकारण्यांत येणार नाहीत. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख ३०/०८/२००८ ही राहील.

२ **अर्ज पाठविण्याचा पत्ता, 'पोस्ट बॉक्स क्र. ०४७, मुख्य डाकघर, अमरावती – ४४४६०१** येथे अंतिम तारखेपर्यंत साध्या पोस्टाने पोहोचेल या हिशोबाने पाठवावा. विहीत मुदत संपल्यानंतर आलेले अर्ज कोणत्याही कारणास्तव (टपाल कार्यालयाकडून झालेला विलंब इ.) विचारांत घेतला जाणार नाही. **अर्ज जलद पोस्टाने (Speed Post), खाजगी कुरिअरने किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवू नयेत. अर्ज मिळाल्याची कुठल्याही प्रकारची पोच दिली जाणार नाही.**

३.१ सहा.यंत्रचालक (प्रशिक्षणार्थी) या पदासाठी अर्जासोबत खुल्या संवर्गातील उमेदवारांसाठी रु.७०/- व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु.५०/- चा राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष (डि.डि.) जोडणे आवश्यक आहे. सदरील रक्कम ना-परतावा स्वरुपाची राहील. सदर राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष (डि.डि.) च्या मागच्या बाजूस उमेदवाराचे संपूर्ण नांव, अर्ज केलेल्या पदाचे नांव, पदाचा कोड व संवर्ग याचा स्पष्टपणे उल्लेख करावा.

३.२ वाहिनी मदतनीस (प्रशिक्षणार्थी) या पदासाठी अर्जासोबत खुल्या संवर्गातील उमेदवारांसाठी रु.३०/- व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु.१५/- चा राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष (डि.डि.) जोडणे आवश्यक आहे. सदरील रक्कम ना-परतावा स्वरुपाची राहील. सदर राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष (डि.डि.) च्या मागच्या बाजूस उमेदवाराचे संपूर्ण नांव, अर्ज केलेल्या पदाचे नांव, पदाचा कोड व संवर्ग याचा स्पष्टपणे उल्लेख करावा.

३.३ वर दर्शविलेल्या रकमेचा राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष (डि.डि.) **"अधीक्षक अभियंता, पारेषण, (संवसु) मंडल, अमरावती "** या नांवाने काढण्यात यावा.

३.४ अपंग उमेदवाराकरीता सदर फी भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.

४ एस.एस.सी. प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला यावर असलेली जन्मतारीख व दिनांक ०१.०८.२००८ रोजी असलेले वय अर्जात नमुद करणे आवश्यक आहे.

५ **अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, शाळा सोडल्याचा दाखला, वय, जातीचा दाखला / जात वैधता प्रमाणपत्र, आवश्यक असल्यास नॉन क्रिमीलेयर दाखला (अ.जाती व अ.जमाती वगळून) तसेच इतर आवश्यक कागदपत्रे/ प्रमाणपत्राच्या साक्षाकिंत प्रती इ. जोडणे आवश्यक आहे. साक्षांकन हे केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रीत अधिकारी / पोस्टमास्तर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच केलेले असावे.**

६ प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा. उमेदवाराने कोणत्या पदाकरिता अर्ज करीत आहे त्याचा कोड क्रमांक, पदाचे नांव याचा लिफापयाच्या वरच्या भागात मध्यभागी स्पष्टपणे उल्लेख करावा.

## (च) निवड पध्दती

१ सहा. यंत्रचालक (प्रशिक्षणार्थी) पदांकरिता पात्र उमेदवारांची यादी तयार करतांना त्यांनी वीजतंत्री / तारतंत्री व्यवसायातील (ट्रेड) आय.टी.आय. च्या अंतिम परिक्षेत मिळवलेले गुण तद्नतर शिकाउ उमेदवारी (Apprenticeship) पुर्ण केल्यानंतर एन.सी.टी.व्ही.टी. परिक्षेत मिळालेले गुण यांचा एकत्रित विचार करुन एकूण गुणांच्या आधारे उतरत्या क्रमाने (कमाल ते किमान) गुणानुक्रमाने निवड यादी तयार करण्यांत येईल.

२ वाहिनी मदतनीस (प्रशिक्षणार्थी) पदांकरिता ज्या उमेदवाराकडे शिकाउ उमेदवारी पुर्ण केल्यानंतर एन.सी.टी. व्ही.टी., नवी दिल्ली यांच्याकडील प्रमाणपत्र असेल अशा उमेदवारांस त्याने आय.टी.आय. च्या परिक्षेत मिळविलेल्या टक्केवारीत १० अतिरिक्त गुण समाविष्ट करुन गुणवत्ता यादी / निवड सूची करण्यांत येईल.

३ **वरील पदांची भरती निव्वळ गुणवत्तेच्या निकषांवर केली जाईल. याबाबत कोणत्याही प्रकारची वैयक्तिक मुलाखत घेण्यांत येणार नाही.**

४ ज्या उमेदवाराचे परीक्षेत मिळविलेले गुण समान असतील त्यामधील म.रा.वि.मंडळाचे/ महापारेषण कंपनीचे ॲप्रेंटिसशिप पूर्ण केलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यांत येईल. दोन किंवा अधिक बहिस्थ उमेदवारांचे एकूण गुण समान असतील तर सदर उमेदवारांची जन्मतारीख विचारांत घेउन त्यांच्यातील जेष्ठता क्रम ठरविण्यांत येईल.

## (छ) इतर अटी.

१ जाहिरातीत दर्शविण्यांत आलेली अर्हता ही 'किमान' अर्हता आहे आणि केवळ ही किमान अर्हता हाच निकष मानून उमेदवार संबंधीत पदाच्या निवडीसाठी पात्र ठरु शकणार नाही.

२ अर्ज करणा-या प्रत्येक उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवाशी असावा. उमेदवाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिका-याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

३ निवड झालेले उमेदवार कंपनीच्या सेवेत रुजू झाल्यानंतर त्यांना मुळ वेतना व्यतिरिक्त महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व इतर भत्ते इ. कंपनीच्या नियमांप्रमाणे मिळण्यास पात्र ठरतील.

४ भरती प्रक्रिये दरम्यान जर एखाद्या उमेदवाराने सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज भरती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यांत अपात्र ठरविण्यांत येईल.

५ जाहिरातीतील पदांची भरती प्रक्रियेबाबतचा प्रशासनाचा निर्णय अंतिम असून त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिक पातळीवर कोणाशीही केला जाणार नाही.

६ भरती प्रक्रियेत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रचार / हस्तक्षेप करण्यांचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल.

७ सहा.यंत्रचालक (प्रशिक्षणार्थी) व वाहिनी / तारमार्ग मदतनीस (प्रशिक्षणार्थी) यांना सहा महिन्यांकरिता प्रशिक्षणार्थी म्हणून नियुक्ती देण्यांत येईल. सदर पदांवर नियुक्त झालेल्या पात्र उमेदवारांनी सहा महिन्यांचे प्रशिक्षण समाधानकाररित्या पूर्ण केल्यानंतर त्यांची नियमित पदावर एक वर्षाकरिता परिविक्षा कालावधीवर (On Probation) नियुक्ती करण्यांत येईल. परिविक्षा कालावधी समाधानकारकपणे पूर्ण केल्यास उमेदवारास नियमाप्रमाणे कायम करण्यांत येईल.

८ मागासवर्गीयांनी उमेदवारांनी खुल्या प्रवर्गांतर्गत अर्ज केला असल्यास तो नमुद केलेला विकल्प बदलता येणार नाही. संबंधित मागासवर्गीयांस सर्व बाबींकरिता त्यास खुल्या प्रवर्गाचा उमेदवार म्हणून समजण्यांत येईल.

९ निवड केलेल्या उमेदवारास या परिमंडलाच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार नियुक्ती देण्यांत येईल.

१० निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी स्वखर्चाने जाउन रुजू होणे आवश्यक राहील.

११ जाहिरातीत बदल किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशतः बदल किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे प्रशासन राखून ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास या कार्यालयाकडून कळविला जाणार नाही.

१२ **निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्याला उमेदवार विहित अर्हता / अनुभव धारण करीत नसल्याचे किंवा त्याचे पूर्वीचे चारित्र गैरवर्तणूकीचे आढळून आल्यास त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यांत येईल. तसेच अशा उमेदवाराची नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.**

१३ निवड समितीने तयार केलेली निवड सूचीची विधी ग्राहयता (Validity) निवडीच्या तारखेपासून एक वर्षाची राहील. त्यानंतर ही निवडसूची नियमाप्रमाणे व्यपगत होईल.

१४ अर्जाचा नमुना **www.mahatransco.in** या संकेत स्थळावरही दिनांक ०२.०८.२००८ पासून ते अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिवसापर्यंत उपलब्ध होईल. उमेदवारांनी अर्ज डाउनलोड करुन भरावा.

**मुख्य अभियंता, (अउदा बां.नि. संवसु परिमंडल, अमरावती)**

# अर्जाचा नमूना

| उमेदवाराचे अलीकडील स्वतः साक्षांकित केलेले छायाचित्र |
|---|

१ **संपूर्ण नांव मराठी भाषेतून :**

______________________________________________

**श्री./श्रीमती** **आडनांव** **प्रथम नांव** **वडिलांचे/ पतीचे नांव**

१ अ **संपूर्ण नांव इंग्रजी भाषेतून :**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

२. **पत्रव्यवहाराचा पत्ता :-** ______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**पीन कोडः** | | | | | | |

३. **कायमचा पत्ता :-** ______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**पीन कोडः** | | | | | | |

४ अर्ज करीत असलेल्या **पदाचे नांव** : ______________________________

५ **पदाचा कोड क्रमांक :** [ ]

६ **जात :-** ______________________________________________

७ राखीव पदांसाठी अर्ज करीत आहात काय **?**

| होय | नाही |
|---|---|
| | |

(राखीव प्रवर्गातील पदांसाठी अर्ज करीत असल्यास जातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत व असल्यास, जात पडताळणी समितीने वैध केलेले जाती वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी.)

७ अ **जातीचा प्रवर्ग** :-

| अ. जाती | अ. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

७ ब विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, विमाप्र व इमाव प्रवर्गातील उमेदवारांनी अर्जासोबत 'उन्नत/प्रगत' गटात मोडत नसल्याचे (**Non-creamy-layer**) सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सोबत जोडली आहे/नाही.

| होय | नाही |
|---|---|
| | |

७ क **महिला आरक्षणांतर्गत** अर्ज करीत आहात काय **?**

| होय | नाही |
|---|---|
| | |

७ ड महिला आरक्षणांतर्गत अर्ज करीत असल्यास उमेदवारांनी यांचे 'उन्नत/प्रगत' गटात मोडत नसलेबाबत (**Non-Creamy Layer**) सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सोबत जोडत आहे/नाही.

| होय | नाही |
|---|---|
| | |

८ **जन्मतारीखः-**

| | | |
|---|---|---|
| | | |
| वर्ष | महिना | दिवस |

शालांत परिक्षा प्रमाणपत्र/ शाळा सोडल्याचा दाखला यानुसार वय (दि.०१/०८/२००८ रोजी वय वर्षे:)

| | | |
|---|---|---|
| | | |
| **वर्षे** | **महिने** | **दिवस** |

९ **शारिरीकदृष्टया अपंग** प्रवर्गातील आरक्षित जागेवर अर्ज करीत आहात काय **?**

| होय | नाही |
|---|---|
| | |

९अ शारिरीकदृष्टया अपंग प्रवर्गातील आरक्षित जागेवर अर्ज करीत असल्यास.
**PS, PD, OA** या प्रवर्गात मोडतात :

| अंध अल्पदृष्टी | | अंशतः कर्णबधीर | | एक हात अधू | |
|---|---|---|---|---|---|
| **PS** | | **PD** | | **OA** | |

तसेच सक्षम / योग्य वैद्यकिय अधिकारी यांनी दिलेले वैद्यकिय प्रमाणपत्र सोबत जोडले आहे काय ?

| होय | नाही |
|---|---|
| | |

(अपंग प्रवर्गांतर्गत अर्ज करीत असल्यास अंशतः दृष्टीदोष, अंशतः बहिरेपण, किंवा एका हाताने अधू इ. चे सक्षम अधिकारी यांनी जारी केलेले वैद्यकिय प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.)

१० प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक यापैकी कुठल्या :
आरक्षणांस अनुसरुन अर्ज करीत आहात ______________________

११ **शैक्षणिक अर्हताः-** (प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात)

| परिक्षेचे नांव | शाळा/ मंडळ / विद्यापीठ / संस्था | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | मिळालेले एकूण गुण | मिळालेली टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

१२ **N.C.T.V.T.** चे सर्टिफिकेट अर्जासोबत जोडले आहे काय ?

| होय | नाही |
|---|---|
| | |

१३ अर्जासोबत धनाकर्ष (डि.डि.) जोडला त्याचा तपशील :-**(धनाकर्ष (डि.डि.) "अधीक्षक अभियंता, पारेषण, (संवसु) मंडल, अमरावती " या नावाने काढण्यात यावा.)**

| **बँकेचे नांव व शाखा** | **धनाकर्ष (डि.डि.) क्रमांक** | **दिनांक** | **रुपये** |
|---|---|---|---|
| | | | |

*मी जाहिर करतो/करते की, वरील माहिती ही संपूर्णपणे खरी असून त्यात खोटेपणा वा दिशाभूल करणारी माहिती आढळून आल्यास कोणत्याही क्षणी माझी उमेदवारी रद्द केली जाईल याची मला पूर्णपणे कल्पना आहे.*

*मी जाहिर करतो/करते की, मला आज रोजी ________ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ________ हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदांसाठी मी अनर्ह ठरविण्यांस पात्र होईल याची मला जाणीव आहे. (विवाहित उमेदवारांसाठी)*

*मी जाहिर करतो/करते की, मी अर्ज करीत असलेल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या / येणा-या कोणत्याही ठिकाणी नियुक्तीवर काम करण्याची माझी तयारी आहे.*

*मला जाहिरातीत नमुद केलेल्या कंपनीच्या सर्व शर्ती व अटी मान्य असून त्यास मी बांधील आहे.*

ठिकाण : **स्वाक्षरी :**

दिनांक: **नांव :**

**अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडल्या आहेत काय ?**

| | | |
|---|---|---|
| १ | शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र | होय/नाही |
| २ | शालांत परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र | होय/नाही |
| ३ | आय.टी.आय. परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र | होय/नाही |
| ४ | शिकाउ उमेदवारी पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र **(N.C.T.V.T.)** | होय/नाही |
| ५ | जातीचे प्रमाणपत्र | होय/नाही |
| ६ | जाती वैधता प्रमाणपत्र | होय/नाही |
| ७ | स्वातंत्र सैनिक / प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र | होय/नाही |
| ८ | प्रगत/उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र | होय/नाही |